भारतीय उच्चायुक्त, लंडन यांना निधी वर्ग करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र. सान्यावि २०१९/प्र.क्र.१४२/बांधकामे
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: २० ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर १९२१-२२ या काळात शिक्षण घेत असताना १० किंग हेन्री रोड NW३ लंडन येथे राहावयास होते. सदरचे घर महाराष्ट्र शासनाने विकत घेतले असून तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे स्मारक करण्याची कार्यवाही सुरू आहे. याबाबतची कार्यवाही भारतीय उच्चायुक्त, लंडन यांचेमार्फत करण्यात येत असून नुतनीकरणाच्या कामाबाबत तेथील स्थानिक स्वराज्य संस्था (Queen Council) यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतच्या सुनावणीच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाच्या पूर्तीसाठी भारतीय उच्चायुक्त, लंडन यांना ८०,००० जीबीपी (अक्षरी जीबीपी ऐंशी हजार फक्त) इतका निधी वर्ग करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२१-२२ दरम्यान लंडनमध्ये वास्तव्य केलेले घर राज्य शासनाने विकत घेतले असून तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे स्मारक करण्याची कार्यवाही सुरु आहे. याबाबतची कार्यवाही भारतीय उच्चायुक्त, लंडन यांचेमार्फत करण्यात येत असून नुतनीकरणाच्या कामाबाबत तेथील स्थानिक स्वराज्य संस्था (Queen Council) यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतच्या सुनावणीच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाच्या पूर्तीसाठी भारतीय उच्चायुक्त, लंडन यांना ८०,००० जीबीपी (अक्षरी जीबीपी ऐंशी हजार फक्त) विनिमय दर विचारात घेता रु.७२,००,०००/- (अक्षरी रुपये बाहत्तर लक्ष फक्त) इतका निधी वर्ग करणेस सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. यावरील होणारा खर्च मागणी क्रमांक एन-३, (०१)(०१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२१-२२ दरम्यान लंडन येथे वास्तव्य केलेल्या घराची देखभाल व दुरुस्ती (कार्यक्रम) लेखाशिर्ष २२२५ डी ८१४ या लेखाशिर्षाखाली ५०, इतर खर्च या बाबीखाली सन २०१९-२० या अर्थसंकल्पीत तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर तरतुदीतून रक्कम वितरीत करण्याकरीता आहंरण व संवितरण अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई यांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच नियंत्रक अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या देयकाकरीता नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.सदर उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून ८०,००० जीबीपी (अक्षरी जीबीपी ऐंशी हजार फक्त) विनिमय दर विचारात घेता रु.७२,००,०००/- (अक्षरी रुपये बाहत्तर लक्ष फक्त) एवढा निधी आरटीजीएस व्दारे प्रथम

सचिव, भारतीय उच्चायुक्त, लंडन यांच्या खात्यात जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे...

Name of Account Holder	: High Commission of India, Chancery Account
Account Number	: 10349901
Name of Bank	: State Bank of India, United Kingdom
Branch	: London Main Branch
Address	: 15 King Street, London, EC2V 8EA
Sort Code	: 608365
IBAN	: GB86SBIN60836510349901
Swift Code	: SBINGB2L
Currency	: Great Britain Pound

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०८२२१५५५४१३२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

DINGLE DINESH RAMCHANDRA

Digitally signed by DINGLE DINESH RAMCHANDRA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, postalCode=400032, street=151 ANNEX,1ST FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fc344849650ce07c3f9adc7e2cd4976b2852065e2acd65f7cee1828c10091458, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DINGLE DINESH RAMCHANDRA
Date: 2019.08.30 12:10:08 +05'30'

(दि. रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. भारतीय उच्चायुक्त, लंडन.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेय/लेखापरिक्षा)महाराष्ट्र१/२,मुंबई/नागपूर
३. वित्त विभाग,(व्यय १५/अर्थसंकल्प-७),मंत्रालय,मुंबई
४. संचालक,लेखा व कोषागारे,फ्री प्रेस जनरल मार्ग,मुंबई
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
६. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
७. रोखलेखापाल (रोखशाखा),सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई
८. निवडनस्ती, बांधकामे.